# शिक्षण विभाग

# पंचायत समिती आमगाव जि.प.गोंदिया

जा.क्र./गसाके/पंसआ/प्रमाणपत्र / 4066 /2022 दिनांक: 25/03/2022

## -: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की भवभूती शिक्षण संस्था आमगाव द्वारा संचालित के.के.इंग्रजी प्राथमिक शाळा आमगाव जि.गोंदिया या शाळेत इयत्ता १ ते ७ वी चे वर्ग नियमित सुरू असून माननीय कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक प्राशाव-२०२१/प्र.क्र.५५/एसएम-५ दिनांक १२ जुलै २०२१ अन्वये नैसर्गिक वाढ या तत्वावर **सत्र २०२१-२२ पासून इयत्ता ८ वी चा वर्ग चालविण्याची परवानगी प्राप्त असून** या शाळेत सत्र २०२१-२२ पासून इ ८ वी चा वर्ग सुरू असून एकूण २५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच **सदर शाळेत आरटीई- २००९ अन्वये २५% राखीव विद्यार्थ्यांना इ १ ते ८ वी वर्गात प्रवेश देण्यात आलेले आहे.**

सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

गटशिक्षणाधिकारी

पंचायत समिती आमगाव

## Education Section

**Panchayat Samiti Amgaon Zilla Parishad Gondia Distt.Gondia**

**Out.no./CRC/PSA/Certificate/4066/2022 Date.25/03/2022**

## Certificate

This Is to certified that Bhawbhuti Shikshan Sanstha K.K.English (P) School,Amgaon Dist-Gondia running Classes form1st to 7th . Honorable Nodal Officer Maharashtra Gov.Letter no. PSV/2021case.No.55/SS5 on dated-12th July 2021 Permission granted to run class VIII from 2021-22 and class VIII has been started in this school from session 2021-22 and a total strength of 25 student . The School is admitting student under RTE 2009 with strength of 25% for the classes from 1st to 8th .

Certificate is being issued.

**Block Education Officer**

**Panchyat Samiti Amgaon**

NOTARY PARASHANATH .P. THER SALEKASA (M.S.) REG.No.-15806 Ex.Dt.05.12.2024 GOVT. OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

CANCELLED CANCELLED

Translated By D.K. Sanghi

PARASHANATH .P. THER
Advocate & Notary
In Front of Rural Hospital,Salekasa
Tah.Salekasa Dist.Gondia (M.S.)

NOTARIAL REG.
ENTRY NO. 249
DATE: 25.03.2021

CERTIFIED TO BE TRUE TRANSLATION

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास** शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: प्राशाव-२०२१/प्र.क्र.५५/एसएम-५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: १२ जुलै, २०२१

**वाचा**

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-२०१८/प्र.क्र.२०४/एस.एम.-५, दिनांक १९.०९.२०१९

२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- प्राशिसं/खाप्राशा/५वी-८वी/ड-५१२/१८७०, दिनांक २५.०५.२०२१.

**शासन निर्णय-**

खालील विवरणात दर्शविलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग **"स्वयंअर्थसहाय्यित"** तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे / शाळेचे नाव | माध्यम | मंजूर केलेला वर्ग | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | के. के. इंग्रजी प्राथमिक शाळा, आमगांव, जि. गोंदिया | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०२१-२२ |

२. प्रस्तुत वर्ग जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१. बालकांचा मोफ़त व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतूदीनुसार भौतिक सोयीसुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याचे जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबंधीत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी.

४. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड क्रमांकाची नोंद शाळेत व सरल पोर्टलवर ठेवावी.

५. संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १९.०९.२०१९ मधील अटींच्या पूर्ततेअधीन सदर मान्यता असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कविता तांडे
१२.०८.२०२१

**(कविता तांडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया.
७) निवडनस्ती (एस.एम.-५).

नमुना दोन

क्र.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/कार्या-८/वशि/ १३९९ /२०२०
कार्यालय जिल्हा परिषद, गोंदिया
( शिक्षण विभाग प्राथमिक)
दिनांक :२९/०६/२०२०

**व्यवस्थापन :- अध्यक्ष /सचिव, भवभुती शिक्षण संस्था, आमगाव.**

**विषय :-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या नियम ११, पोटनियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**संदर्भ :-** आपले दिनांक २०/०७/२०२० च्या अर्जाच्या संदर्भानुसार आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार / शाळेची तपासणी च्या आधारावर

मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,गोंदिया** दिनांक **०१/०७/२०२०** पासुन दिनांक **३०.०६.२०२३** पर्यंत (३ वर्षाच्या ) कालावधीसाठी इयत्ता **१ ली ते ७ वी** करीता **के.के.इंग्रजी प्राथमिक शाळा आमगाव ता. आमगाव, जि.गोंदिया** (शाळेचे नांव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या अधिन आहे :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्णता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिनियम,२००९ (जोडपत्र एक)आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थीसंख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म,जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतुन काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उर्तीण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करण्या-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि
(आठ) शिक्षकाने /शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियम कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकुण बांधकाम क्षेत्र.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ.
- वर्गखोल्यांची संख्या.
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली.
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्रय प्रसाधनगृहे -जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा.
- दुपारचे जेवन शिजविण्यासाठी स्वयंपाकघर.
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता.
- वाचन साहित्य विनाशुल्क उपलब्ध.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम,१८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठविण्यात यावी.

१६. **तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक / युडायस क्रमांक २७११०२००१०७ असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.**

१७. शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रृटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकार देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८. संसथेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्र " तीन " नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, गोंदिया

# नमुना दोन

क्र : शिक्षण/प्राथ/स्था/कार्या-७/वशि/२५६/२०१७
कार्यालय जिल्हा परिषद, गोंदिया
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :- ८/२/१८

**व्यवस्थापक :- अध्यक्ष/सचिव श्री भवभुती शिक्षण संस्था**

**विषय:-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्या बाबत.

**संदर्भ:-** आपले दिनांक ०९.०१.२०१६ च्या अर्जाच्या संदर्भानुसार आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी च्या आधारावर

मी **शिक्षणाधिकारी** (प्राथमिक) जिल्हा **परिषद, गोंदिया** दिनांक **०१.०७.२०१३** पासुन दिनांक **३०.०६.२०१६** पर्यंत एक / दोन / तिन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते **७ वी** करिता **के. के. इंग्रजी प्राथमिक शाळा आमगांव**, ता. आमगांव, **जि. गोंदिया** शाळेचे नांव , पत्त्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे:-**

०१. मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

०२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.

०३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि गटातील बालकांना, पहील्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्याना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

०४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते ठेवण्यात येईल.

०५. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

०६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

०७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतुन काढुन टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(आठ) शिक्षकाने / शिक्षकेतर कर्मचाऱ्याने शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

०८- शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

०९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे आहेत

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकूण बांधकाम क्षेत्र
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ
- वर्गखोल्यांची संख्या
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडांगणात्मक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता
- वाचन साहित्य विद्यार्थ्यास उपलब्ध.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक / युडायस क्रमांक २७१९०२००१०७ असा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्र " तीन " नुसार इतर शर्ती सोबत जोडल्या आहेत.

07.2.17

(उल्हास नरड)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया